# राज्य निवडणूक आयोग

## महाराष्ट्र

१ ला माळा, नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग, मुंबई- ४०० ०३२.


---

(प्रसिद्धिपत्रक) दि. ०१ डिसेंबर २०२५

**२४ नगरपरिषद व नगरपंचायतींसाठी आणि १५४ सदस्यपदांसाठी २० डिसेंबरला मतदान**

**अपील कालावधीनंतरच्या पुढील टप्प्यांसाठी सुधारित कार्यक्रम**

मुंबई, दि. ०१ (रानिआ): नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकीत निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या निर्णयाविरुद्ध जिल्हा न्यायालयात अपील झालेल्या प्रकरणांसंदर्भात २३ नोव्हेंबर २०२५ किंवा त्यानंतर निर्णय आलेल्या २४ अध्यक्षपदांच्या आणि विविध ठिकाणच्या १५४ सदस्यपदाच्या जागांवरील निवडणुकांची प्रक्रिया अपील कालावधीनंतरच्या पुढील टप्प्यापासून सुधारित कार्यक्रमानुसार राबविली जाईल, त्यासाठी २० डिसेंबर २०२५ रोजी मतदान होणार आहे. उर्वरित अन्य सर्व ठिकाणी नियोजित निवडणूक कार्यक्रमानुसार २ डिसेंबर २०२५ रोजी मतदान होईल.

राज्य निवडणूक आयोगाने ४ नोव्हेंबर २०२५ रोजी राज्यातील २४६ नगरपरिषदा आणि ४२ नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर केला होता. आता निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या निर्णयाविरुद्ध अपील असलेल्या प्रकरणांचा निर्णय २३ नोव्हेंबर २०२५ रोजी किंवा त्यानंतर आल्याने संबंधित ठिकाणी सुधारित कार्यक्रमाप्रमाणे निवडणूक प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. अध्यक्षपदासंदर्भातील अपिलांचा निकाल उशिरा आलेल्या नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या संपूर्ण क्षेत्रासाठी निवडणूक प्रक्रिया सुधारीत कार्यक्रमानुसार राबविली जाईल. अध्यक्षपदासोबतच सदस्यपदांची एकत्रित निवडणूक घेण्याची कायद्यात तरतूद आहे. ज्या ठिकाणच्या सदस्यपदासाठी अपील होते, तिथे मात्र फक्त त्या जागेपुरताच सुधारित निवडणूक कार्यक्रम राबविला जाईल.

अपील कालावधीनंतरच्या टप्प्यांसाठीच्या सुधारित कार्यक्रमानुसार आता १० डिसेंबर २०२५ रोजी दुपारी ३ वाजेपर्यंत नामनिर्देशनपत्र मागे घेता येतील. अंतिमरीत्या निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी आणि निवडणूक चिन्हांचे वाटप ११ डिसेंबर २०२५ रोजी होईल. २० डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत मतदान होईल. मतमोजणी २१ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी १० वाजता सुरू होईल.

**अध्यक्षपदांसह सर्व सदस्यपदांसाठी सुधारित कार्यक्रमानुसार निवडणूक होत असलेल्या २४ नगरपरिषदा व नगरपंचायतींची जिल्हानिहाय नावे: ठाणे-** अंबरनाथ. **अहिल्यानगर-** कोपरगाव, देवळालीप्रवरा, पाथर्डी व नेवासा. **पुणे-** बारामती व फुरसुंगी- उरुळी देवाची. **सोलापूर-** अनगर व मंगळवेढा. **सातारा-** महाबळेश्वर व फलटण. **छत्रपती संभाजीनगर-** फुलंब्री. **नांदेड-** मुखेड व धर्माबाद. **लातूर-** निलंगा व रेणापूर. **हिंगोली-** बसमत.

**अमरावती-** अनंजनगाव सूर्जी. **अकोला-** बाळापूर. **यवतमाळ**- यवतमाळ. **वाशीम-** वाशीम. **बुलढाणा-** देऊळगावराजा. **वर्धा-** देवळी. **चंद्रपूर**- घुग्घूस.

**सुधारित कार्यक्रमानुसार निवडणूक होत असलेल्या ७६ नगरपरिषदा व नगरपंचायतींमधील १५४ सदस्यपदांच्या जागांचा तपशील असा: अमरावती:** अचलपूर-२, दर्यापूर-१, धारणी-२ व वरूड-१. **अहिल्यानगर:** जामखेड-२, राहुरी-१, शिर्डी-१, शेवगाव-३, श्रीगोंदा-१, श्रीरामपूर-१ व संगमनेर-३. **कोल्हापूर:** गडहिंग्लज-१. **गडचिरोली:** आरमोरी-१ व गडचिरोली-३. **गोंदिया:** गोंदिया-३ व तिरोडा-१. **चंद्रपूर:** गडचांदूर-१, बल्लारपूर-१, मूल-१ व वरोरा-१. **छत्रपती संभाजीनगर:** गंगापूर-२, पैठण-४ व वैजापूर-२. **जळगाव:** अंमळनेर-१, पाचोरा-२, भुसावळ-३, यावल-१, वरणगाव-२ व सावदा-३. **जालना:** भोकरदन-२. **ठाणे:** बदलापूर-६. **धाराशिव:** उमरगा-३ व धाराशिव-३. **नांदेड:** कुंडलवाडी-१, भोकर-१ व लोहा-१. **नागपूर:** कामठी-३, कोंढाळी-२, नरखेड-३ व रामटेक-१. **नाशिक:** ओझर-२, चांदवड-१ व सिन्नर-४. **परभणी:** जिंतूर-१ व पुर्णा-२. **पालघर:** पालघर-१ व वाडा-१. **पुणे:** तळेगाव-६, दौंड-१, लोणावळा-२ व सासवड-१. **बीड:** अंबेजोगाई-४, किल्ले धारूर-१ व परळी-५. **बुलढाणा:** खामगाव-४, जळगाव जामोद-३ व शेगाव-२. **भंडारा:** भंडारा-२. **यवतमाळ:** दिग्रस-३, पांढरकवडा-२ व वणी-१. **रत्नागिरी:** रत्नागिरी-२. **लातूर:** उद्‌गीर-३. **वर्धा:** पुलगाव-२, वर्धा-२ व हिंगणघाट-३. **वाशीम:** रिसोड-२. **सांगली:** शिराळा-१. **सातारा:** कराड-१ व मलकापूर-२. **सोलापूर:** पंढरपूर-२, बार्शी-१, मैंदर्गी-१, मोहोळ-२ व सांगोला-२ आणि **हिंगोली:** हिंगोली-२.

*०-०-०*

(Jagdish More, SECM)